# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 03 January 2026

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०३ जानेवारी २०२६ सायंकाळी ६.१०**

****

- तथागत भगवान गौतम बुद्धांचे पिपरहवा अवशेष हे भारताच्या समृद्ध वारशाचा अभिन्न घटक असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
- छत्तीसगडमध्ये १४ नक्षलवादी ठार तर तेलंगणात २० नक्षलवाद्यांचं आत्मसमर्पण
- पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला सेवानिवृत्त-सदानंद दाते यांनी स्वीकारला पदभार

आणि

- स्त्रीशिक्षणाच्या प्रणेत्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना सर्वत्र अभिवादन

****

तथागत भगवान गौतम बुद्धांचे पिपरहवा अवशेष हे भारताच्या समृद्ध वारशाचा अभिन्न घटक असल्याचं प्रतिपादन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. नवी दिल्ली इथं या अवशेषांच्या भव्य आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाच्या उदघाटनप्रसंगी ते आज बोलत होते. नववर्षाच्या सुरुवातील असा प्रेरणादायी कार्यक्रम होणे, ही चांगली सुरुवात असल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं. हे अवशेष परदेशात जाण्याच्या अनुषंगाने बोलतांना पंतप्रधान म्हणाले -

**बाईट – पंतप्रधान नरेंद्र मोदी**

****

राष्ट्रीय छात्र सेना-एनसीसीच्या प्रजासत्ताक दिन शिबीरात देशभरातून सुमारे अडीच हजार कॅडेट्स सहभागी झाले आहेत. एनसीसीचे लेफ्टनंट जनरल वीरेंद्र वत्स यांनी दिल्लीत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. या कॅडेट्समध्ये सुमारे नऊशे मुलींचा तसंच २५ मित्रदेशांच्या कॅडेट्सचाही समावेश असल्याचं, वत्स यांनी सांगितलं. हे

सर्व कॅडेट्स प्रजासत्ताक दिन संचलनासह २८ जानेवारीला पंतप्रधान रॅलीपर्यंत होणाऱ्या विविध कार्यक्रमांमध्ये सहभागी होणार आहेत.

****

छत्तीसगड मध्ये आज दोन वेगवेगळ्या ठिकाणी सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत एकूण १४ नक्षलवादी मारले गेले. बिजापूर मध्ये बासुगुडा भागात नक्षलवादी असल्याची माहिती मिळताच पोलिसांचं पथक तिथं तातडीनं रवाना झालं. त्यानंतर गगनपल्ली गावाजवळ दोन्ही बाजूंनी झालेल्या गोळीबारात दोन नक्षलवादी मारले गेले. सुकमा जिल्ह्यातही पोलिसांच्या कारवाईत १२ जण मारले गेले. सुरक्षा दलांनी चकमकीच्या ठिकाणाहून सर्व मृतदेह ताब्यात घेतले आहेत. याशिवाय, घटनास्थळावरून एक एके-४७ रायफल, एक एसएलआर रायफल आणि इतर शस्त्रंही जप्त करण्यात आली आहेत.

****

हैद्राबाद इथं वीस नक्षलवाद्यांनी आज तेलंगणाचे पोलीस महासंचालक शिवधर रेड्डी यांच्यासमोर आपल्या शस्त्रसाठ्यासह आत्मसमर्पण केलं. यात पीपल्स लिबरेशन गुरिल्ला आर्मीच्या बटालियन कमांडर बादसे सुक्का उर्फ देवा आणि तेलंगणा समिती सदस्य कंकनला राजी रेड्डी यांचा समावेश आहे. पोलिसांनी यांना एक कोटी ८१ लाख ९० हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले असून, तातडीची मदत म्हणून प्रत्येकी २५ हजार रुपये निधी दिला आहे.

****

महाराष्ट्राच्या पहिल्या महिला पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला आज सेवानिवृत्त झाल्या. पोलीस दलात साडे ३७ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करणाऱ्या शुक्ला यांना मुंबईत भोईवाडा इथल्या पोलीस मैदानात मानवंदना देण्यात आली. त्यानंतर शुक्ला यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. त्यांच्या यशस्वी कारकिर्दीबद्दल मुख्यमंत्र्यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

राज्याचे नवनियुक्त पोलीस महासंचालक सदानंद दाते यांनी आज रश्मी शुक्ला यांच्याकडून आपल्या पदाचा कार्यभार हाती घेतला. तत्पूर्वी त्यांनीही मुख्यमंत्र्यांची सदिच्छा भेट घेतली. त्यांच्या नियुक्तीबद्दल अभिनंदन करत मुख्यमंत्र्यांनी त्यांना कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

दहशतवाद विरोधी पथक, एनआयए, सीबीआय, सीआरपीएफ अशा महत्त्वाच्या संस्थांमधल्या कामाचा प्रदीर्घ अनुभव असलेले सदानंद दाते भारतीय पोलीस सेवेच्या १९९० च्या तुकडीतले अधिकारी आहेत.

****

केंद्र सरकारने नुकत्याच संमत केलेल्या विकसित भारत जी राम जी विधेयकामध्ये चार वेगवेगळ्या श्रेणीत कामांची विभागणी करण्यात आली आहे. धाराशिव जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष यांनी याबाबत अधिक माहिती दिली –

**बाईट – मैनाक घोष, मुख्य कार्यकारी अधिकारी**

****

नाशिक इथं आज अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या ६० व्या पश्चिम महाराष्ट्र प्रदेश अधिवेशनाचे उद्घाटन झालं. यावेळी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन आणि अमरावती इथले पीठाधीश्वर जितेंद्रनाथ महाराज उपस्थित होते. युवकांनी शिक्षा, संस्कार – पर्यावरण क्षेत्रात काम करण्याची गरज यावेळी महाजन यांनी बोलताना व्यक्त केली.

****

स्त्रीशिक्षणाच्या प्रणेत्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आज सर्वत्र त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सावित्रीबाई फुले यांना त्यांच्या जयंतीनिमित्त आदरांजली वाहिली. समाजातल्या वंचित आणि दुर्बल घटकांच्या सेवेसाठी त्यांनी केलेलं कार्य प्रेरणादायी आहे, असं पंतप्रधानांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त आज विविध कार्यक्रम पार पडले. बीड शहरात अभिवादन रॅली काढण्यात आली. नांदेड इथंही जिल्हाधिकारी कार्यालयात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं. परभणीत पूर्णा तालुक्यात विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले आणि जिजामाता यांच्या वेशभूषा साकारून त्यांचा जीवनपट सादर केला.

****

ज्या व्यक्तिमत्त्वांकडे पाहून आपल्याला प्रेरणा मिळते, अशा थोर व्यक्तींमध्ये सावित्रीबाई फुले यांचं नाव अतिशय महत्त्वाचं आहे, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज काढले. सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त सातारा

जिल्ह्यातल्या नायगाव या त्यांच्या जन्मगावी त्यांच्या स्मारकाचं आणि महिला प्रशिक्षण केंद्राचं भूमिपूजन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आज झालं, त्यावेळी बोलतांना मुख्यमंत्री म्हणाले –

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

या स्मारक परिसरात महिलांना सक्षम करण्यासाठी प्रशिक्षण केंद्रही इथं उभारलं जाईल, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. नायगावचं नाव बदलून सावित्राबाई फुले यांच्या नावावरून ठेवायचा निर्णय जर इथल्या ग्रामसभेनं घेतला, तर विनाविलंब त्याला मान्यता देऊ, असं आश्वासनही त्यांनी दिलं. विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे, राज्याचे मंत्री छगन भुजबळ, साताऱ्याचे पालकमंत्री शंभुराज देसाई, जयकुमार गोरे आणि इतर यावेळी उपस्थित होते.

****

छत्रपती संभाजीनगर इथं औरंगपुरा परिसरात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विविध संघटनेच्या वतीने अभिवादन करण्यात आलं. दरम्यान, विविध ठिकाणी सकाळी प्रभातफेरी, घोषवाक्ये आणि प्रेरणादायी संदेशांद्वारे सामाजिक प्रबोधन करण्यात आलं. विविध स्वयंसेवी संस्थांच्या वतीने व्याख्याने, निबंध, वक्तृत्व स्पर्धा तसेच सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आलं.

****

छत्रपती संभाजीनगर इथं सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळातर्फे सेवा आणि प्रबोधन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या दोन व्यक्तींचा दरवर्षी डॉ. रखमाबाई राऊत सेवा पुरस्कार तसंच डॉ. भीमराव गस्ती प्रबोधन पुरस्काराने गौरव करण्यात येतो.

यंदा, नशिक जिल्ह्यातील हिवाळी इथले शिक्षक केशव गावित यांना डॉ. रखमाबाई राऊत सेवा पुरस्कार आणि नांदेड जिल्ह्यातील फरीदा बक्श उर्फ गुरुमाय यांना डॉ. भीमराव गस्ती प्रबोधन पुरस्काराने यावर्षी सन्मानित करण्यात येत आहे. २१ हजार रुपये आणि मानपत्र, असं या दोन्ही पुरस्कारांचं स्वरूप आहे. उद्या रविवारी ४ जानेवारी रोजी छत्रपती संभाजीनगर इथं, बीड बायपास परिसरात ओंकार शैक्षणिक संकुलात, सायंकाळी साडे पाच वाजता हा कार्यक्रम होणार आहे. पुरस्कारांचे हे सातवे वर्ष आहे.

****

शीखांचे गुरु तेग बहादुर साहेब यांच्या ३५० व्या हौतात्म्य वर्षानिमित्त नांदेड इथं "हिंद-दी-चादर" या उपक्रमाचा 'आरंभता की अरदास' हा विधी शहरातल्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मैदानावर साजरा झाला. यावेळी मुख्य कार्यक्रमाच्या मंडपाचे भूमीपूजन तख्त सचखंड श्री हजूर साहिब गुरुद्वाराचे पंचप्यारे यांच्या हस्ते करण्यात आले.

****

राज्यात आज सर्वात कमी नऊ पूर्णांक एक दशांश सेल्सियस तापमान जळगाव इथं नोंदवलं गेलं. त्याखालोखाल अहिल्यानगर इथं १२ पूर्णांक तीन तर धाराशिव इथं सुमारे साडे बारा अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. बीड इथं साडे अकरा, छत्रपती संभाजीनगर इथं १३ पूर्णांक आठ, परभणी इथं १४, तर नांदेड इथं सुमारे १५ अंश सेल्सियस तापमान नोंदवलं गेलं.

****